| ...न प्रशिक्षण संशोधन व सुरक्षितता ...राष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी नाशिक - ४२२००४. | |
|---|---|
| मुख्य अभियंता | |
| ...अ.व. सहसंचालक | |
| उपसंचालक (...) | |
| सहाय्यक संचालक (शाखा) | |
| अधीक्षक | |
| शाखा | |
| आवक क्र. | २०७८ |
| दिनांक: | |


**उद्योगाचे स्थापन निश्चियन करताना नदीच्या पूर नियंत्रण रेषेपासूनचे अंतर ठरविण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे.**

**महाराष्ट्र शासन**
जलसंपदा विभाग
मंत्रालय, मुंबई-४०००३२.

**शासन परिपत्रक** क्रमांक संकीर्ण २०१२/(१८२/१२)/सिं.व्य.(महसूल)
दिनांक २४/०४/२०१२

**संदर्भ :-** १) शासन निर्णय, पर्यावरण विभाग,मंत्रालय,मुंबई क्र. मंमबै-२००९/३२५/प्र.क्र.६१/तांक १, दि. १३ जुलै,२००९
२) शासन परिपत्रक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ क्र.एफडीडब्ल्यू १०८९/२४३/८९/सिंव्य (कामे), दि. २१.९.१९८९

**<u>प्रस्तावना :</u>**

नदी खोऱ्यांच्या क्षेत्रामध्ये उद्योगधंदे स्थापन करण्याच्या दृष्टीने पर्यावरण विभागाने दि.१३.७.२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये सविस्तर धोरण जाहीर केले आहे. यामध्ये महाराष्ट्रातील प्रमुख २० नद्यांच्या व उप नदींच्या क्षेत्राचे, नदीच्या त्या क्षेत्रातील अपेक्षित पाणीवापरासंबंधी विचार करुन अ-१, अ-२, अ-३ व अ-४ या चार वर्गामध्ये वर्गीकरण करण्यात आलेले आहे. सदरहू धोरणाचा मूळ उद्देश नदीच्या पाण्याची गुणवत्ता विहित उपयोगासाठी योग्य राखून उद्योगाचे स्थाननिश्चियन तसेच नागरी क्षेत्रामध्ये पर्यावरण सुविधेचा विकास होण्यासाठी आहे. सदरहू शासन निर्णयात उद्योगाचे स्थाननिश्चियन करताना नदीच्या नियंत्रक पूर रेषेपासूनचे (Red line ) अंतर ठरविताना क्षितीज समांतर सरळ रेषेस हे अंतर कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग यांनी शासन परिपत्रक दिनांक २१.९.१९८९ नुसार प्रमाणित करावे अशी तरतूद आहे. जलसंपदा विभागाच्या शासन परिपत्रकानुसार नियंत्रक पूर रेषा (Red line) ही नदीच्या दोन्ही तिरावरील नियंत्रण क्षेत्राची हद्द ठरविणारी समतलांक रेषा असते. याकरिता प्रकल्पाचे संकल्पनातील ,सांडव्यावरील वाहणारा संकल्पित महत्तम पूर विसर्ग व धरणा खालील स्वतंत्र पाणलोट क्षेत्रातून अपेक्षित पूरविसर्ग यामुळे येणारा एकत्रित पूरविसर्ग <u>किंवा</u> ज्या भागांत धरण नसेल त्या भागात १०० वर्षातून एकदा या वारंवारितेचा पूरविसर्ग विचारात घेण्यात यावा असे नमूद केले आहे.

नदी-खोऱ्यांच्या क्षेत्रामध्ये उद्योग स्थापन करण्याबाबत सचिव (पर्यावरण) यांचे अध्यक्षतेखाली धोरण पुनर्विलोकन समितीमध्ये पर्यावरण विभागाच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर केले जातात. सदरहू प्रस्तावामध्ये उपरोक्त नमूद केल्यानुसार नदीपासूनच्या अंतराबाबतचे प्रमाणपत्र हे राज्यातील कार्यकारी अभियंता यांचे मार्फत वेगवेगळ्या प्रपत्रामध्ये दिले जाते. त्यामुळे या बैठकीमध्ये सदरहू उद्योगास मान्यता द्यावी किंवा कसे याबाबत संभ्रम निर्माण होतो. ही बाब विचारात घेता राज्यामध्ये सदरहू प्रमाणपत्राचा एकच मसुदा असावा असे विचाराधीन होते. त्यानुसार आता पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**शासन परिपत्रक :**

नदी-खोऱ्यांच्या क्षेत्रामध्ये उद्योग स्थापन करण्याकरिता आवश्यक असलेले नदीपासूनच्या अंतराबाबतचे प्रमाणपत्र हे कार्यकारी अभियंता यांचेमार्फत खालील विहित नमुन्याप्रमाणे देण्यात यावे.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, ..........................................(उद्योग संस्थेचे नाव) मौ. ....... ता............... जि. ......................, गट नं.............. येथे स्थित असून या उद्योगाच्या जागेचे सर्वात जवळच्या टोकाचे ............. (नदीचे नाव) नदीच्या नियंत्रक पूर रेषेपासूनचे (खालील तळ टिप नुसार) अंतर क्षितीज समांतर रेषेत ...............मीटर इतके आहे. याबाबत मी व्यक्तिशः खात्री केलेली आहे. सदरहू उद्योगाची जागा, नदी व त्या जागेचे नदीपासून अंतर दर्शविणारा नकाशा सोबत जोडला आहे.

कार्यकारी अभियंता
(विभागाचे नाव)

ठिकाण :

दिनांक :

**नियंत्रक पूर रेषा (Red line) :-** प्रकल्पाचे संकल्पनातील सांडव्यावरील वाहणारा संकल्पित महत्तम पूर विसर्ग व धरणा खालील स्वतंत्र पाणलोट क्षेत्रातून अपेक्षित पूरविसर्ग यामुळे येणारा एकत्रित पूरविसर्ग **किंवा** ज्या भागांत धरण नसेल त्या भागात १०० वर्षातून एकदा या वारंवारितेचा पूरविसर्ग विचारात घेवून येणारी समतलांक रेषा ही नियंत्रक पूर रेषा असेल.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१२०४२४१२०४००४०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(सं. दे. कुलकर्णी)
शासनाचे उप सचिव.

प्रति,

मा. मंत्री, जलसंपदा (कृखोपाविम वगळून) यांचे खाजगी सचिव,
मा. मंत्री, जलसंपदा (कृखोपाविम) यांचे खाजगी सचिव,
मा. राज्यमंत्री जलसंपदा यांचे खाजगी सचिव,
प्रधान सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव (उद्योग) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई,
सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग,
सर्व महासंचालक, जलसंपदा विभाग,
सर्व मुख्य अभियंता व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग,
सर्व उपसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग,
सर्व अवर सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
सर्व कक्ष अधिकारी, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
निवडनस्ती कार्यासन सिंव्य धोरण / महसूल

मुख्य अभियंता
संकल्पन, प्रशिक्षण, संशोधन व सुरक्षितता
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी
नाशिक - ४२२ ००४.

प्रति. दि.: / /२०१
मा. अधीक्षक अभियंता

D:\AVS\GR flood NOC Certifiate 2012.doc

यांना माहीती व कार्यवाहीसाठी सविनय सादर.

अधीक्षक अभियंता,
म. सं. सं. (वि. गु.)
नासिक – ४.

अधीक्षक अभियंता,
म. सं. सं. (वि. गु.)
नासिक – ४.